MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १६७/२०११-१२ दिनांक :

१) सौ. निलव्वा तमाण्णा पुजारी,
मु.पो. सोन्याळ, ता. जत, जि. सांगली. — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,
सं व सु मंडळ कार्यालय, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली — विरुध्द पक्षकार

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

सौ. निलव्वा तमाण्णा पुजारी, मु.पो. सोन्याळ, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. १५.२.२०१२ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार ग्राहकाने आपली शेत जमीन गट क्र. ८०६ येथे नवीन शेतीपंप वीज जोडणी मिळावी यासाठी चलन रु. ४०००/- दि. २६.५.२०११ रोजी पावती क्र. ०२०३९७६ नुसार भरले आहे. चाचणी अहवाल दि. ७.६.२०११ रोजी दिलेला आहे. वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने दि. १६.९.२०११ पर्यंत विद्युत पुरवठा मिळणे आवश्यक होते, तो आजतागायत मिळाला नाही. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दि. ११.११.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने कुठलेही आदेश पारीत केले नाहीत. मंचाकडून अपेक्षित मदत - परवानेधारकाला एका निश्चित कालावधीत कृती मानके पूर्ण करण्याचे मंच आदेश देऊ शकते. त्यामुळे एका निश्चित कालावधीत वीज जोडणी देणे बाबत आदेश वि.प.स द्यावेत. ग्राहकाने तक्रारीसोबत चलन भरल्याची पावती जोडली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १०.४.२०१२ च्या लेखी अहवालात ग्राहकाने शेतीपंप वीज जोडणीसाठी दि. २६.५.२०११ ला चलन भरल्याचे मान्य केले आहे. ज्या ग्राहकांनी दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केलेले आहेत अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे वरिष्ठ कार्यालयाचे आदेश आहेत. सौ. पुजारी यांनी चलन दि. २६.५.२०११ रोजी भरले असल्याने दि. ३१.३.२०११ पूर्वी ज्या ग्राहकांनी चलन भरलेले आहे त्यांचे काम झाल्यानंतर सौ. पुजारी यांचे काम जेष्ठता यादीप्रमाणे दि. १.४.२०१२ नंतर हाती घेण्यात येईल असे नमूद केले आहे. ग्राहकाची भरपाईची मागणी मान्य करण्यात येवू नये, कारण कृती मानके विनियम २००५ कलम १२.२ नुसार कृती मानकांमधील कमतरता दूर करण्यात आली नसल्यामुळे भरपाईचा कालावधी निश्चित होत नाही असे म्हटले आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि. १२.४.२०१२ ला घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदार गैरहजर, प्रतिनिधी नेमला नाही. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता श्री. कदम, कनिष्ठ अभियंता श्री. कुलकर्णी उपस्थित. नोडल ऑफीसर यांनी लेखी अहवालात दिलेले म्हणणे मांडले व प्रस्तुत ग्राहकास दि. ३०.६.२०१२ पर्यंत वीज जोडणी देण्यात येईल असे मंचासमोर सांगितले.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाची वीज जोडणी एका निश्चित कालावधीत व्हावी ही मागणी मंजूर करणे योग्य आहे काय ?

उत्तर : होय

कारणमिमांसा

उभयबाजूंच्या कथनानुसार ग्राहकाने शेतीपंप नवीन वीज जोडणीसाठी दि. २६.५.२०११ रोजी चलन भरले व दि. ७.६.२०११ रोजी चाचणी अहवाल दिलेला आहे. वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने ३ महिन्याचे मुदतीत वीज जोडणी झाली नाही हे स्पष्ट होते. अंतर्गत कक्षाने कुठलेही आदेश केले नाहीत ही बाब ग्राहकाच्या तक्रारीतून स्पष्ट होते. लेखी अहवालात ज्या ग्राहकांनी दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केले आहेत अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे वरिष्ठ कार्यालयाचे आदेश आहेत असे म्हटले आहे, परंतु त्याची प्रत लेखी अहवालासोबत किंवा मंचासमोर सादर केली नाही. प्रस्तुत ग्राहकाचे वीज जोडणीचे काम दि. १.४.२०१२ नंतर हाती घेण्यात येईल असे म्हटले आहे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

सेक्शन ४३ विद्युत कायदा २००३ व कृती मानके विनियम २००५ मधील तरतुदीनुसार ग्राहकाने वीज मागणी केल्यानंतर त्यांस विद्युत पुरवठा करणे परवानेधारकावर बंधनकारक आहे. विलंबाबद्दल वि.प.ने कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही अथवा तांत्रिक अडचण सांगितली नाही. ग्राहक गा-हाणे निवारण मंच व  विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील कलम ८.२ नुसार मंच ग्राहकाचे गाऱ्हाणे ठराविक मुदतीत दूर करण्याचे आदेश देऊ शकते. या ठिकाणी वि.प.च्या अधिकाऱ्यांनी ग्राहकास दि. ३०.६.२०१२ पर्यंत वीज जोडणी देतो असे मंचासमोर सुनावणीचेवेळी सांगितले. मुद्दा क्र.१ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे.  खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी संख उप विभाग यांनी मंचासमोर कबूल केल्याप्रमाणे ग्राहकास दि. ३०.६.२०१२ पर्यंत त्यांची शेत जमीन गट क्र. ८०६ येथे नवीन शेतीपंप वीज जोडणी द्यावी  व  त्याचा पूर्तता अहवाल मंचास द्यावा.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६  ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :                                                    ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले,  सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com